मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२३। पान १

# आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी पोलिसांना झापले!

## चिंचवडमधील अवैध गॅस रिफिलिंग स्फोटावरून अधिकाऱ्यांना तंबी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवडमधील गॅस रिफिलिंग करताना झालेल्या स्फोटावरून आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे पोलिसांवर चांगले संतापले. तीन ते चार पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत तंबी दिली आहे. यामुळे पिंपरी- चिंचवड पोलिसांचे धाबे दणाणले आहेत. रविवारी रात्री अकराच्या सुमारास ताथवडे जेएसपीएम शाळेच्या जवळ अवैधरित्या गॅस रिफिलिंग करताना भीषण स्फोट झाले. या घटनेमुळे पिंपरी- चिंचवड शहरात एकच खळबळ उडाली.



पुण्यातील ससूनमधून ड्रस माफिया चालते त्याच पद्धतीने पिंपरी- चिंचवडच्या ताथवडे भागात गॅस माफिया चालतो का? असा प्रश्न त्यांनी पोलिसांना विचारला आहे. आज सकाळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी स्फोट झालेल्या ठिकाणी भेट दिली आणि त्याच जवळ तानाजी सावंत यांच शाळा आहे. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय शिंदे, पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्यासह इतर पोलीस अधिकारी होते, त्यांना तानाजी सावंत यांनी चांगलेच झापले. पिंपरी- चिंचवडमध्ये रविवारी रात्री अकराच्या सुमारास ताथवडे परिसरात कॅप्सूल टँकरमधून कमर्शियल गॅस रिफिलिंग करत असताना भीषण एका पाठोपाठ एक असे नऊ स्फोट झाले. यामुळे पिंपरी- चिंचवडमध्ये एकच खळबळ उडाली. घटनेवरून आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी पिंपरी- चिंचवड पोलिसांना चांगलेच धारेवर धरले आहे. तात्काळ २४ तासाच्या आत तीन ते चार पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी तंबी आरोग्यमंत्र्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना दिली. ज्या परिसरात ही घटना घडली

### ताथवडे भागात गॅस माफिया चालतो का?

» पुण्यातील ससूनमधून ड्रग्स माफिया चालते त्याच पद्धतीने पिंपरी- चिंचवडच्या ताथवडे भागात गॅस माफिया चालतो का? असा प्रश्न त्यांनी पोलिसांना विचारला आहे. आज सकाळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी स्फोट झालेल्या ठिकाणी भेट दिली आणि त्याच जवळ तानाजी सावंत यांच शाळा आहे. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय शिंदे, पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्यासह इतर पोलीस अधिकारी होते, त्यांना तानाजी सावंत यांनी चांगलेच झापले.

तिथं कॉलेज, स्कूल आहे. दिवसा घटना घडली असती तर शेकडो जण जखमी झाले असते किंवा आणखी काही घडलं असतं. गॅस रिफिलिंग हे दोन नंबरचं आहे. ससूनमध्ये जस ड्रग्स माफिया सुरू आहे. तस इथं माफिया सुरू आहे का? तात्काळ २४ तासाच्या आत या ठिकाणचे तीन ते चार अधिकारी बदलले गेले पाहिजे अशी तंबी सावंत यांनी दिली. या सगळ्या प्रश्नांवर उपस्थित पोलीस अधिकारी हे केवळ होकारार्थी उत्तर देत होते. या प्रकरणी तीन जणांना वाकड पोलिसांनी अटक केली आहे.

# स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगतापांच्या स्वीय सहाय्यकाचा शरद पवार गटात प्रवेश!

## सलग आठ वर्ष होते जगताप यांचे स्वीय सहाय्यक

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवडमध्ये शरद पवार गट अधिक जोमाने कामाला लागल्याचं दिसत आहे. शरद पवार गटात सध्या इनकमिंग सुरू आहे. स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांचे पीए सतीश दत्तात्रेय कांबळे यांनी शरद पवार गटात रोहित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. त्यांनी आठ वर्ष लक्ष्मण जगताप यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहिले. पुण्यामध्ये कांबळे यांनी शहराध्यक्ष



प्रशांत जगताप आणि तुषार कामठे यांच्यासह रोहित पवार यांच्या उपस्थितीत शरद पवार गटात प्रवेश केला. पिंपरी- चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला आहे.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात शरद पवार गट जोमाने कामाला लागला आहे. शरद पवार गटात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भाजपाचे एकनिष्ठ आमदार स्वर्गीय लक्ष्मण जगताप यांचे पीए सतीश कांबळे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. यामुळे शरद पवार गटाची ताकद वाढल्याचे बोलले जात आहे.

कांबळे हे सलग आठ वर्ष जगताप यांच्याकडे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहिलेले आहे. जगताप यांची राजकीय कारकीर्द त्यांनी जवळून पाहिल्याने त्याचा फायदा शरद पवार गटाला होऊ शकतो. शरद पवार गटात प्रवेश करताच त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस डॉक्टर समन्वयक पदाची जबाबदारी दिली असून याबाबतचे नियुक्तीपत्र नेते रोहित पवार यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले. कांबळे हे आगामी निवडणुकीच्या काळात शरद पवार गटासाठी महत्त्वाचे ठरतील असा विश्वास शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी व्यक्त केला आहे.

# आगामी निवडणुका विकासावर नाहीतर विचारांवर लढल्या जातील : जयंत पाटील

## डॉ. अशोक शिलवंत यांच्या स्मृती प्रित्यर्थ विविध पुरस्कारांचे वितरण

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुढील निवडणुका फसव्या विकासाच्या मुद्यांवर न होता, विचारांवर लढल्या जातील. आता सामान्य माणूस योग्य विचार करूनच निर्णय घेतील. सध्या परिस्थिती अवघड असली तरी मतदार राजा विवेक बुद्धीने निर्णय घेईल असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी पिंपरी येथे केले. सोमवारी पिंपरीतील आचार्य यात्रे रंगमंदिर येथे अशोक सार्वजनिक विकास सोसायटीच्या वतीने आयोजित केलेल्या स्मृतीशेष डॉ. अशोक शीलवंत यांच्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन व पुरस्कार वितरण सोहळ्यात जयंत पाटील बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस खासदार श्रीनिवास पाटील, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, कार्यक्रमाच्या संयोजिका, माजी नगरसेविका डॉ. सुलक्षणा शीलवंत – धर, ज्येष्ठ नेते प्रकाश म्हस्के, ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा, माजी महापौर कवीचंद भाट, राजरतन भंते, माजी नगरसेवक माई काटे, मुक्ता पडवळ, बबन गाढवे, मोहम्मद भाई पानसरे, मारुती भापकर तसेच ॲड. राजरत्न शिलवंत, पुरस्कार विजेते माजी आमदार जयदेव गायकवाड, संपादक संजय आवटे, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, भाऊसाहेब डोळस, चंद्रकांत शेटे, स्वाती सामक आदी उपस्थित होते. यावेळी जयंत पाटील यांनी सांगितले की, सम्राट अशोक यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम डॉ. अशोक शिलवंत यांनी केले आहे .मणिपूरच्या हिंसक घटना पाहता आमचा शिक्षणाचा पाया कमकुवत आहे असे वाटते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या एका मताची किंमत दाखवून दिली आहे. या एका मताने देशाची सत्ता बदलता येते हे आता सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत देशात लोकशाही टिकवण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाने, सुजाण मतदारांनी योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे. पुढील निवडणुका फसव्या विकासावर न होता विचारांवर होतील. आता सामान्य माणूस योग्य विचार करूनच निर्णय घेतील असेही जयंत पाटील यांनी सांगितले. खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले की, मिळवणं आपल्यासाठी असते तर जुळवनं समाजासाठी असते, असे नेहमी समाजासाठी जुळवण्याचे काम डॉ. अशोक शीलवंत यांनी केले आहे. त्यांचा वारसा त्यांची कन्या डॉ. सुलक्षणा आणि पुत्र राजरतन करीत आहेत याचा निश्चित अभिमान आहे. यावेळी संत तुकाराम नगर मधील गुणवंत विद्यार्थ्यांना आणि शहरातील विविध सामाजिक संस्था ट्रस्ट यांना आर्थिक मदतीचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. श्रीपाल सबनीस यांनी सांगितले की, विश्वशांतीचा विचार शेवटच्या क्षणापर्यंत डॉ. अशोक शीलवंत यांनी रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांचा परिवार काम करीत आहे. त्यांचे व्यक्तिमत्व सात्विक राजकारण, समाजकारण धर्मकारण करणारे होते. सर्व महापुरुषांच्या संचितांचे बीज अशोक शिलवंत यांच्यामध्ये मला जाणवतात. स्वागत, प्रास्ताविक सुलक्षणा शीलवंत – धर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिलीप कांबळे आभार ॲड. राजरत्न शीलवंत यांनी मानले.



# चंद्रशेखर बावनकुळे बुधवारी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर!

## आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविजय २०२४ घर चलो अभियान

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभेची निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने 'महाविजय- २०२४' अभियान सुरु केले आहे. महाराष्ट्रातून महायुतीला ४५ पेक्षा जास्त जागा मिळाव्यात, असा निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून मावळ लोकसभा प्रवास दौरा, घर चलो अभियानाच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पिंपरी-चिंचवडचा दौरा करणार आहेत, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली.



भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दि.११ ऑक्टोबर २०२३ रोजी पिंपरी-चिंचवडचा दौरा नियोजित केला आहे. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षातर्फे राज्यात निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. त्यानुसार, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला जात आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचा राज्यभरातील संपूर्ण ४८ लोकसभा मतदारसंघांचा दौरा सुरू आहे. त्याअनुषंगाने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचे बुधवारी सायंकाळी ४ वाजता किवळे-मुकाई चौक येथे आगमन होवून त्यांचे शहर भाजपा, महिला मोर्चा व युवा मोर्चाच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात येईल. पिंपरी-चिंचवड येथे मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभा मतदारसंघातील 'भाजपा वॉरियर्स' शी संवाद साधणार आहेत. यानंतर सायंकाळी ६ वाजता 'घर चलो अभियान' अंतर्गत पिंपरी, राधिका चौक येथून अभियानाला सुरुवात होईल.

> **“प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार, मावळ लोकसभा मतदार संघातील भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठका घेण्यात येत आहे. या बैठकीत भाजपाचे 'महाविजय-२०२४' संदर्भात चर्चा करण्यात येत आहेत. त्यासाठी मावळ लोकसभा मतदार संघातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, वॉरिअर्स, बूथप्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, घराघरांत पोहचणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा सज्ज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा भाजपा महायुती सरकार स्थापन होईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.**
>
> **– शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# राज्यात गुन्हेगारांना मिळतोय राजाश्रय!

## रुग्णसेवेच्या नावाखाली रुग्णालय गुन्हेगारांचा अड्डा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून रुग्णालय हे आरोग्य सेवा देणारे रुग्णालय आहे की गुन्हेगारांचा अड्डा, असा प्रश्न पडला आहे. रुग्णसेवेच्या नावाखाली रुग्णालय गुन्हेगारांचा अड्डा बनले आहे. याला जबाबदार कोण? गंभीर स्वरूपाचे आरोप असलेले आरोपी तेथे आहेत. हे आरोपी बिनधास्तपणे बडदास्त घेत आहेत. ड्रग्ज माफिया, मटका किंग सगळेच रुग्णालयात मजा मारत असून आपले धंदे चालवत आहेत. याला पोलिस किंवा डॉक्टर जबाबदार असतील का? हे सर्व करण्याची हिंमत राजकीय राजाश्रयाशिवाय शक्य नाही. या राज्यात गुन्हेगारांना राजाश्रय मिळत आहे. सरकारने या प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) त्वरित चौकशी करावी,' अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. पुणे दौऱ्यावर आलेले असताना वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ससून रूग्णालयातील गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान राजकारणाबद्दल बोलताना ते म्हणाले,''एकमेकांशी वैचारिक लढाई यापूर्वीच्या राजकारणात होती, परंतु आताच्या राजकारणात बदलाची भावना आहे. वैचारिक लढाई ही वैयक्तिक झाली आहे. देशात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूका जाहीर झाल्या असून या राज्यांमध्ये काँग्रेस भक्कम आहे. तर काही राज्यांमध्ये काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष अशी थेट लढाई आहे. त्यात आताच्या सर्व क्षणानुसार पाचही राज्यात काँग्रेस बहुमताने येईल, असा विश्वास वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. तसेच, लोकसंख्येनुसार बार्टीची आर्थिक तरतूद असावी, जातीनिहाय जनगणनेसाठी गरजेची असेही त्यांनी अधोरेखित केले. वडेट्टीवार म्हणाले, 'केंद्र सरकारने एकीकडे दारूला करमुक्त केले आहे. तर दुसरीकडे अन्नधान्यावर वस्तू व सेवा कर (जीएसटी) लावला आहे. इंग्रजापेक्षाही खालच्या स्तरावर केंद्र सरकार जात आहे.'



> 'मुख्यमंत्रीपद, पालकमंत्रीपद, उपमुख्यमंत्रीपद कोणाला द्यायचे! एक 'दादा' दुसऱ्या 'दादा'वर वरचढ ठरतोय, हे सध्याचे राज्याचे राजकारण आहे. हे राजकारण राज्याचा सत्यानाश करण्यासाठी सुरू आहे. आताच्या काळात प्रचंड निविदा काढल्या जात आहेत. त्यातून सरकारी तिजोरीची प्रचंड लूट सुरू असून वस्तादांची टोळी राजरोजसपणे सरकारी तिजोरी लुट करत आहे.'
>
> - विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते

शिवसेनेच्या अपात्र आमदारांबाबतच्या निर्णयाला दिरंगाई होत असल्याबाबत ते म्हणाले, 'शिवसेनेच्या आमदारांविरोधात निर्णय असणार आहे किंवा कायद्याच्या चौकटीत हे आमदार अपात्र ठरतील, अशी भीती असल्यामुळे निर्णय घेण्यास विलंब लावला जात आहे.' 'विरोधी पक्ष म्हणून कंत्राटी नोकरभरतीच्या विरोधात यापूर्वी आवाज उठविला आहे. हा निर्णय आरक्षण आणि गुणवत्तेच्या मुळावर उठणारा आहे. कंत्राटी नोकरभरतीचा निर्णय रद्द करावा, ही मागणी लावून धरली आहे. शाळांचे खासगीकरण आणि महाबळेश्वरमधील ग्रामीण रुग्णालयाचे खासगीकरणाला विरोध आहे, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. 'चंद्रपूर असो किंवा पुणे येथील पोटनिवडणूक होत नाही, कारण या दोन्ही ठिकाणी भाजपला सपशेल पराभव दिसत होता. भाजपने केलेल्या चार वेगवेगळ्या सर्वेक्षणातून त्यांचा पराभव निश्चित होता. त्यामुळे दोन्ही निवडणूका पुढे ढकलण्यात आल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# साखर व्यापाऱ्यांच्या माहितीचे संकलन

## दर नियंत्रणासाठी केंद्र सरकारकडून उपाययोजना

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्राकडून राज्यातील साखर व्यापाऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. साठेबाजी, काळाबाजार रोखून दर नियंत्रित ठेवण्यासाठी साखर व्यापाऱ्यांकडून जीएसटी आणि साखर साठ्याची माहिती संकलित करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. सध्या बाजारात साखरेचे दर ३५०० ते ३६०० दरम्यान आहेत.

पुढील हंगामात कमी साखर उत्पादन होण्याची शक्यता आणि आगामी दसरा, दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर साखरेचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी केंद्राकडून उपाययोजना केल्या जात आहेत. साखर खरेदीची निविदा भरल्यापासून ते साखर किरकोळ विक्री होईपर्यंत प्रत्येक व्यापाऱ्याकडून किती साखर खरेदी केली, किती जीएसटी भरला याची माहिती संकलित केली जात आहे. याशिवाय जीएसटी पोर्टलवर दर सोमवारी व्यापाऱ्यांनी आपला साठा नोंद करावा, असे आदेशही केंद्र सरकारकडून देण्यात आलेले आहेत.केंद्र सरकारकडे खासगी व सहकारी साखर कारखान्यांची तपशीलवार माहिती आहे. कारखानानिहाय उत्पादन, कारखान्यांना साखर विक्रीचा ठरवून दिलेला कोटा, झालेली साखर विक्री आणि शिल्लक साखर, अशी सर्व माहिती केंद्र सरकारकडे असते. त्यामुळे पुन्हा व्यापाऱ्यांची माहिती का संकलित केली जात आहे, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. केंद्र सरकारने देशात पुरेशा प्रमाणात साखर उपलब्ध राहावी म्हणून या पूर्वीच साखर निर्यातीवर बंदी घातली आहे. साखरेचा किमान विक्री दरही निश्चित करून दिला आहे. आता साखरेची साठेबाजी करून काळाबाजार केला जाऊ नये. सणासुदीत दरवाढ होऊ नये, म्हणून सरकार विशेष काळजी घेत असल्याचे समोर आले आहे. केंद्र सरकार साखर व्यापाऱ्यांचे जीएसटी पत्रक तपासून पाहत आहे. साखरेच्या निविदा प्रक्रियेपासून किरकोळ व्यापाऱ्यांपर्यंत केंद्राचे लक्ष आहे. साठेबाजी टाळण्यासाठी दर सोमवारी जीएसटी पोर्टलवर साखरेचा साठा नोंद करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत, अशी माहिती साखर व्यापारी मुकेश गोयल यांनी दिली.



# लवकरच कंत्राटी भरती भ्रष्टाचाराचा भांडाफोड?

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य सरकारच्या कंत्राटी भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. उमेदवारांकडून पैसे उकळण्यात येत आहेत. या भ्रष्टाचाराचे पुरावे माझ्याकडे आहेत. या भ्रष्टाचाराचा मुंबईमध्ये त्याचा भंडाफोड करणार असल्याची माहिती विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. राज्यातील शाळा आणि दवाखान्यांचे खासगीकरण करण्याच्या सरकारच्या धोरणाचा विरोध करत असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक संस्थेच्या कार्यक्रमासाठी पुण्यात आलेल्या वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. कंत्राटी भरतीमुळे आरक्षण धोक्यात आले आहे. बेरोजगारांची फौज राज्यात उभी राहणार आहे. त्यामुळे हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी आहे. सरकारच्या निर्णयाविरोधात चंद्रपुरात आंदोलन झाले. सरकारला युवकांच्या मतांची गरज नाही, असेच चित्र आहे. आगामी काळात हेच युवक सरकारला धडा शिकवतील, असे वडेट्टीवार यांनी सांगितले. पुणे आणि चंद्रपूर येथील लोकसभेच्या पोटनिवडणुकींमध्ये भाजपचा पराभव झाल्याने पोटनिवडणुका जाहीर होत नसल्याचे चित्र आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये छत्तीसगढ, राजस्थान, मध्यप्रदेशात भाजपशी थेट लढत असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

# सीओईपी विद्यापीठ कात टाकणार!

## सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाने भविष्यवेधी परिवर्तन करण्याचा निर्णय

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर नावलौकिक मिळवण्यासाठी सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाने भविष्यवेधी परिवर्तन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत विद्यापीठासमोरील अडचणी आणि समस्यांचा अभ्यास करून त्यावर कालबद्ध पद्धतीने उपाययोजना करण्यात येणार असून, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना डोळ्यासमोर ठेवून 'सीओईपी इंटरनॅशनल सेंटरची'ही स्थापना करण्यात येणार आहे. सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी ही माहिती दिली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुधीर आगाशे, कुलसचिव प्रा. नरेंद्र सोनावणे, केपीएमजीचे नारायणन्



या वेळी उपस्थित होते. भविष्यवेधी परिवर्तनाच्या दृष्टीने केपीएमजी या सल्लागार संस्थेची मदत घेतली जाणार आहे. त्यासाठीचा सहकार्य करार करण्यात आला. डॉ. चौधरी म्हणाले, की सीओईपी ही १७० वर्षे जुनी संस्था आहे. मात्र आता या संस्थेने उच्च स्तरावर जाण्याची गरज आहे. त्यासाठी केपीएमजीची मदत घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील पाच वर्षांच ही परिवर्तनाची प्रक्रिया राबवण्यात येईल. क्रमवारीतील स्थान उंचावणे, संशोधनाला चालना देण्यासह संस्थेचा पूर्वीचा लौकिक परत मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. महाविद्यालय ते विद्यापीठ या प्रवासानंतर आता पुढे काय करायचे यासाठी दिशा मिळणे आवश्यक आहे. केवळ विद्यार्थी संख्या वाढवण्याच्या मागे न लागता देशाला आवश्यक असलेले काम झाले पाहिजे. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय पातळीपुरते मर्यादित न राहता आंतरराष्ट्रीय स्तराचे लक्ष्य ठेवून काम करण्याचा निर्णय नियामक मंडळाने घेतला. या कामी आवश्यकतेनुसार राज्य सरकार, माजी विद्यार्थ्यांनाही जोडून घेण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. आगाशे यांनी सांगितले. चिखली येथील संकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. या संकुलात आठ उत्कृष्टता केंद्राची निर्मिती करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### चिखली येथील संकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर

**» महाविद्यालय ते विद्यापीठ या प्रवासानंतर आता पुढे काय करायचे यासाठी दिशा मिळणे आवश्यक आहे. केवळ विद्यार्थी संख्या वाढवण्याच्या मागे न लागता देशाला आवश्यक असलेले काम झाले पाहिजे. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय पातळीपुरते मर्यादित न राहता आंतरराष्ट्रीय स्तराचे लक्ष्य ठेवून काम करण्याचा निर्णय नियामक मंडळाने घेतला. या कामी आवश्यकतेनुसार राज्य सरकार, माजी विद्यार्थ्यांनाही जोडून घेण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. आगाशे यांनी सांगितले. चिखली येथील संकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.**

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून तीन पदवी आणि एक पदव्युत्तर पदवी असे चार नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यात रोबोटिक्स आणि एआय, एमबीए इन बिझनेस ॲनालिटिक्स अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे, असे प्रा. आगाशे यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात दिलेल्या शैक्षणिक लवचिकतेच्या अनुषंगाने पुढील शैक्षणिक वर्षापासून अर्थशास्त्र, धोरण निर्मिती, वैद्यकीय उपकरणे, कृषि अभियांत्रिकी अशा विषयांतील अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन असल्याचे डॉ. चौधरी यांनी सांगितले.

# शहरात वाढू लागला उन्हाचा 'ताप'!

## शहरात ३४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मॉन्सूनने राज्याच्या बहुतांश भागातून माघार घेतली असून कोरड्या हवामानामुळे सध्या उन्हाचा ताप अधिकच जाणवू लागला आहे. कमाल तापमानात सरासरीपेक्षा झालेली काहीशी वाढ यामुळे ऑक्टोबर हीटचा प्रभाव होत आहे. पुणे शहरात उन्हाच्या चटक्यांची अनुभूती होत असून पुढील आठवडाभर ही स्थिती अशीच कायम राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पुणे शहरातील कमाल तापमानात सरासरीपेक्षा वाढ झाली असून सोमवारी (ता. ९) शहरात ३४ अंश सेल्सिअस



कमाल तापमान नोंदले गेले. सरासरीपेक्षा तापमानात दोन अंशांनी वाढ झाली होती. कमाल तापमानात होत असलेली वाढ यामुळे उन्हाच्या झळा तीव्र होत असून दिवसा घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. सध्या पावसाची कोणतीही चिन्हे नसून कोरड्या हवामानाचा अंदाज कायम आहे. त्यामुळे उकाडा आणि उन्हाचा ताप नागरिकांना असाच सहन करावा लागणार आहे. तर येत्या रविवारपर्यंत (ता. १५) शहर आणि परिसरात कमाल तापमान हे ३५ ते ३७ अंशांपर्यंत पोहचू शकते. राज्यात ही सध्या असेच चित्र पाहायला मिळत असून उन्हाचा चटका वाढल्याने विदर्भ देखील भाजून निघत आहे. दरम्यान, सोमवारी (ता. ९) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद ब्रह्मपुरी येथे ३७.१ अंश सेल्सिअस इतकी झाली. तर मध्य महाराष्ट्र, विदर्भासह मराठवाड्यातील काही भागात पारा ३४ अंशांच्या पुढे आहे.

# द्रुतगती मार्गावर दोन तासांचा ब्लॉक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मुंबई द्रुतगतीमार्गावर पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर उद्या दुपारी बारा ते दोन दरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. अशी माहिती महामार्ग पोलिसांनी दिलेली आहे. किलोमीटर ४५ आणि ४५/ ८०० या ठिकाणी ग्रँटी उभारण्यात येणार आहे.

यासाठी हा दोन तासाचा ब्लॉग घेतला जाणार आहे. तरी मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी याची नोंद घ्यावी तसेच पर्यायी मार्गाचा वापर करावा अस आवाहन महामार्ग पोलिसांनी केल आहे.

महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावरील अमृतांजन पूल आणि बोरघाट येथे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत ग्रँटी उभारण्यात येणार असून यासाठी १२ ते २ चा दरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. यावेळी मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणारी वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे. जड वाहतूक वगळता हलक्या वाहनांनी जुन्या पुणे- मुंबई महामार्गाचा वापर करावा अस आवाहन महामार्ग पोलिसांनी केल आहे. पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावर दररोज लाखो वाहन ये-जा करतात. त्यामुळे हा महत्त्वाचा मार्ग मानला जातो.